# लघुलेखक (निम्न श्रेणी) पदाच्या उमेदवारांना महत्वाच्या सूचना :

1) उमेदवाराने परिक्षेच्या विहित वेळेपेक्षा अर्धा तास अगोदर परिक्षा कक्षात उपस्थित राहावे.

2) परिक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवाराने त्यांना देण्यांत आलेले प्रवेश प्रमाणपत्र परीक्षेच्यावेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

3) परिक्षेस येतेवेळी स्वतःच्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान एक ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

4) प्रत्यक्ष परिक्षा सुरु होण्यापूर्वीचा कालावधी उमेदवारांनी स्थानापन्न होणे, उमेदवारांची प्रवेशपत्र व इतर कागदपत्रावरुन ओळख पटवणे, उमेदवारांची हजेरी तपासणे व सूचना देणे यासाठी राखीव ठेवण्यांत येईल.

5) परिक्षेच्यावेळी मोबाईल, अनधिकृत वस्तू इत्यादी साहित्य परिक्षा कक्षात स्वतःजवळ ठेवण्यास सक्त मनाई आहे.

6) परिक्षा सुरु झाल्यानंतर ते परिक्षा कालावधी संपेपर्यंत कोणत्याही उमेदवारास कोणत्याही कारणासाठी परिक्षा कक्षाबाहेर जाण्याची परवानगी दिली जाणार नाही.

7) उमेदवारानी उत्तरपत्रिकेतील विहीत जागी प्रवेशपत्रात नमूद केलेला बैठक कमांक व नोंदणी कमांक इंग्रजी भाषेत काळजीपूर्वक लिहावा. उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर कोठेही स्वतःचे नांव लिहु नये किंवा स्वाक्षरी करु नये किंवा विशिष्ट चिन्हे/खुणा/निशाणी करु नये. असे आढळून आल्यास सदर उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन केले जाणार नाही.

8) उमेदवार परिक्षा सुरु होण्यापूर्वी किंवा परिक्षेदरम्यान पर्यवेक्षकाने दिलेल्या सूचनांचे उल्लंघन करताना अथवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन करतांना आढळल्यास त्याला तात्काळ परिक्षा हॉलबाहेर काढले जाईल.

9) गैरपध्दतीचा अवलंब करणा-या उमेदवाराविरुध्द करण्यात येणा-या कारवाईबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

10) <u>इंग्रजी व मराठी लघुलेखन व टंकलेखन परिक्षेबाबत सूचना</u> :

➢ लघुलेखक पदासाठी उमेदवारांची प्रत्येकी 20 गुणांची इंग्रजी व मराठी भाषेतील लघुलेखनाची वेग चाचणी परीक्षा घेण्यात येईल. ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क. | भाषा | श्रृतलेखनाचा कालावधी (Duration of Dictation) | श्रृतलेखनाचा वेग (Speed of Dictation) | एकूण शब्द | प्रतिलेखनाचा अवधी (Transcription time) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इंग्रजी | 6 मिनिटे | 100 श.प्र.मि. | 600 | 40 मिनिटे |
| 2 | मराठी | 8 मिनिटे | 80 श.प्र.मि. | 640 | 45 मिनिटे |

➢ लघुलेखन चाचणीमध्ये कट ऑफ (Cut Off) गुण मिळविल्यानंतर उमेदवाराला 20 गुणांची मराठी टंकलेखनाची परिक्षा संगणकावर द्यावी लागेल व त्यानंतर पात्र उमेदवारांची 20 गुणांची इंग्रजी भाषेतील टंकलेखनाची चाचणी परिक्षा संगणकावर घेण्यात येईल.

1 <u>मराठी टंकलेखन परिक्षेबाबत सूचना</u> :

- मराठी टंकलेखन परीक्षा ही 20 गुणांची असून उमेदवाराला संगणकावर 10 मिनिटांत 300 शब्द टंकलिखित करावे लागतील (30 श.प्र.मि.)
- उमेदवारांची मराठी टंकलेखन परिक्षा ही "Kruti Dev-055" या फॉन्टमध्ये घेण्यात येणार आहे.
- जे उमेदवार मराठी टंकलेखन परिक्षेमध्ये सेवाप्रवेश समितीने ठरविल्याप्रमाणे कट ऑफ (Cut Off) गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांना, इंग्रजी टंकलेखन परिक्षेसाठी पात्र समजण्यात येईल.

2 <u>इंग्रजी टंकलेखन परिक्षेबाबत सूचना</u> :

- इंग्रजी टंकलेखन परीक्षा ही 20 गुणांची असून उमेदवाराला संगणकावर 10 मिनिटांत 400 शब्द टंकलिखित करावे लागतील (40 श.प्र.मि.)
- उमेदवारांच्या इंग्रजी टंकलेखन परिक्षेमध्ये "Arial / Charter/Times New Roman/ Verdana" पैकी एक फॉन्ट वापरावयाचा आहे.
- जे उमेदवार इंग्रजी टंकलेखन परिक्षेमध्ये सेवाप्रवेश समितीने ठरविल्याप्रमाणे कट ऑफ (Cut Off) गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांना, मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

11) परिक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखीव राहतील.

आदेशावरुन